नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:३०/०४/२०२६

पुणे महानगरपालिका
मा. स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र.६

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार, दि.०७/०५/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका (नवीन विस्तारित इमारत) येथे** भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

उपआयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र. १३४

उप आयुक्त परिमंडळ क्र.३ कार्यालयाचे नियंत्रणखालील क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्यांबाबतची दिनांक ०१/०२/२०२६ ते दि.२८/०२/२०२६ पर्यंतची माहिती निदर्शनास आणणेबाबत.मा.अति. महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/परि.३/४३ दिनांक २३/०४/२०२६ रोजीचे पत्र.

विषय क्र. १३५

उप आयुक्त परिमंडळ क्र.३ कार्यालयाचे नियंत्रणखालील क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्यांबाबतची दिनांक ०१/०३/२०२६ ते दि.३१/०३/२०२६ पर्यंतची माहिती निदर्शनास आणणेबाबत.मा.अति. महापालिका आयुक्त (वि) यांचा जा. क्र.मआ/परि.३/५७ दिनांक ३०/०४/२०२६ रोजीचे पत्र.

मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. १३६

मा.खंडू सतीश लोंढे व मा. पायल विराज तुपे यांचे दि.२४/०४/२०२६ चे पत्र.

वीर वरदान चॅरिटेबल ट्रस्ट रजिस्टर्ड नं F0065206 (PUNE), असा असून संस्थेचा पत्ता परमारनगर K.P.C.T मॉल, B विंग ऑफिस नं२, वानवडी, पुणे. ४११०१३ या संस्था सहकार तत्वावर चालविण्यात येणा-या नोंदणीकृत संस्था असून या संस्थामधून अनेक गोर गरिब महिला व गरजू लोकांना रोजगार उपलब्ध होतो. ही संस्था शिक्षण, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण, बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे तसेच शैक्षणिक, समाजिक, विधवा महिला, क्रीडा, पर्यावरण आणि सुशिक्षित बेरोजगार व अनाथ आश्रमासाठी काम करते.पुणे महानगरपालिकेमधील विना निविदा निघणा-या ३ लाखांच्या (लक्ष) आतील कामे मिळावेत.

सेवक वर्गाची प्रकरणे

विषय क्र.१३७

आरोग्य कार्यालयाकडील श्री. आशिष अशोक उबाळे – शिपाई वर्ग -४ यांचे निलंबन प्रकरणी मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार पहिली ते सहावी सहामाही निदर्शनास आणणेबाबत. मा.अति. महापालिका आयुक्त (इ) यांचे जा. क्र.मआ/साप्र/४४ दिनांक २७/०४/२०२६ रोजीचे पत्र.

विषय क्र. १३८

सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाकडील श्रीमती छाया यशवंत जातेगावकर हुद्दा – बिगारी (वर्ग-४) यांची निलंबन कालावधीत दि.०४/०२/२०२६ रोजी पहिली सहामाही पूर्ण झालेली आहे. सदरची बाब मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत. मा.अति. महापालिका आयुक्त (इ) यांचे जावक क्र.मआ/साप्र.४७ दिनांक २९/०४/२०२६ रोजीचे पत्र.

सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

विषय क्र. १३९

ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आरोग्य विभागामार्फत सार्वजनिक स्वच्छता व पडीक हद्दीचे झाडणकाम / साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. प्रियांक एन्टरप्रायजेस यांचेकडून दि.१/४/२०२६ पासून र.रु.८०१३७६१०/- (अक्षरी – आठ कोटी एक लाख सदोतीस हजार सहाशे दहा रुपये फक्त) ॲटपार (०.००% दराने) रकमे पर्यंत काम करून घेण्यास अधिक टेंडर अटी व शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भात्यातील भाव वाढ अदा करणेस व कामाचे बिल अदा करणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करण्यास मा.स्थायी समिती यांची मान्याता मिळणेबाबत. मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि. क्र. १/४५, दि. २७/०४/२०२६ चे पत्र.

मागील सभेचे विषय

विषय क्र.१४०

संत तुकाराम माध्यमिक विद्यालय, पाषाण येथे इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मराठी माध्यम विज्ञान, वाणिज्य आणि कला कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/इओ/२०१८, दि. १८/०३/२०२६ चे पत्रावर झालेला मा. शिक्षण समिती ठराव क्र.२ दि.१०/०४/२०२६ विचारासाठी.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा असे दि.३०/०४/२०२६ च्या सभेत ठरले होते)

नगरसचिव
पुणे महानगरपालिका